श्री. राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्याविरूध्द प्राप्त तक्रारींबाबत चौकशी करण्यासाठी चौकशी समितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.- भाप्रसे १११७/प्र.क्र.१०८/१०-अ
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. २७.११.२०१७.

संदर्भ:- १.साप्रवि, शासन निर्णय क्र. भाप्रसे १११७/प्र.क्र.१०८/१०-अ, दि. २९.०८.२०१७
२. साप्रवि, शासन शुध्दिपत्रक क्र. भाप्रसे १११७/प्र.क्र.१०८/१०-अ, दि. २५.०९.२०१७

प्रस्तावना:-

सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा तसेच विधान परिषदेत श्री. राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्याविरूध्दच्या भ्रष्टाचार/अपसंपदा/अन्य आरोपांबाबत चर्चा झाली होती. सदर चर्चेवर निवेदन करताना मा. मुख्यमंत्री यांनी श्री. राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्याविरूध्दच्या आरोपांसंदर्भात/तक्रारींसंदर्भात चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले सदर आश्वासन तसेच शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी विचारात घेऊन, श्री. राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्याविरूध्दच्या भ्रष्टाचार/अपसंपदा/अन्य आरोपांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी संदर्भ क्रमांक-१ येथे नमूद दिनांक २९.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये श्री.जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीच्या अध्यक्षांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने समितीला चौकशीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सदर शासन निर्णयान्वये श्री. राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्याविरूध्दच्या भ्रष्टाचार/अपसंपदा/अन्य आरोपांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी श्री.जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीस चौकशीसाठी दिनांक ३०.११.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने. Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2017.12.02 15:49:56 +05'30'

संगणक सांकेतांक क्र २०१७११३०१८४५५१४५०७

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) मा. विरोधी पक्षनेते (विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा. विरोधी पक्षनेते (विधान परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७) श्री. जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त भाप्रसे
८) पोलीस आयुक्त, मुंबई
९) श्री. प्रविण पडवळ, अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई
१०) श्री. रावसाहेब दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, संरक्षण व सुरक्षा यांचे कार्यालय, २८, वजू कोटक मार्ग, बॅलार्ड पियर, फोर्ट, मुंबई-४०० ००१
११) पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे अन्वेषण), मुंबई
१२) निवड नस्ती (का. ९ आणि १०-अ).

F:\Bandekar Madam\Enquiry Committee.doc